स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम/माध्य/उ.माध्य.परीक्षा/4394
दिनांक - 28 / 02 /2023

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :- माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१०वी व इ.१२वी मार्च २०२३ परीक्षेसाठी खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रस्तावांचे छाननी शुल्क आकारणीबाबत..**

संदर्भ :-१.राज्यमंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./परीक्षा-७/६७११ दि.१२/१२/२०२२ चे पत्र
२. या कार्यालयाचे क्र.कोविमं/उच्च माध्य.परीक्षा / २५५६ दि.१५/१२/२०२२ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्रइ.१०वी व इ.१२वी मार्च २०२३ परीक्षेसाठी खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यासाठीचे प्रस्ताव शाळा / क.महाविद्यालयाकडूनमा.शिक्षणाधिकारी / जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेमार्फत या कार्यालयास प्राप्त होतात.

खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रस्तावाची छाननीसाठी मार्च २०२३ परीक्षेपासून **प्रती विद्यार्थी रु.२५/- (अक्षरी पंचवीस फक्त) छाननी शुल्क** आकरणे बाबत संदर्भीय पत्र क्र.०२ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे.

शाळा / क.महाविद्यालयाने खेळाडू प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी व एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रस्ताव जिल्हा शिक्षणाधिकरी(माध्य.) यांच्याकडे **दि.०५/०४/२०२३** पर्यंत सादर करत असतानांच कोल्हापूर विभागीय मंडळाच्या नावे निर्धारित रक्कम भरणा केलेल्या बँक चलनाची प्रत अथवा या कार्यालयामध्ये रोखीने भरणा केलल्या पावतीची प्रत सोबत जोडूनच प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

ज्या शाळा / क.महाविद्यालयाने खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रस्ताव प्रती विद्यार्थी रु.२५/- छाननी शुल्क न भरता सादर केले आहेत त्यांनी कोल्हापूर विभागीय मंडळाच्या नावे निर्धारित शुल्क भरणा केलेल्या बँक चलनाची प्रत अथवा या कार्यालयामध्ये रोखीने भरणा केलल्या पावतीची प्रत जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावास जोडण्यात यावीत म्हणजे खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड सवलतीचे अतिरिक्त गुण देणे सुलभ होईल याची नोंद घ्यावी.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-

१. शिक्षणाधिकारी (माध्य.), सातारा / सांगली / कोल्हापूर.
२. क्रीडा अधिकारी, सातारा / सांगली / कोल्हापूर.

यांना सुचित करण्यात येते की, खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड या प्रकाराचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव स्विकारत असताना शाळांनी प्रस्ताव छाननी शुल्क प्रती विद्यार्थी रु.२५/-(रु.पंचवीस फक्त) विभागीय मंडळाच्या नावे रक्कम **दि.०५/०४/२०२३** पूर्वी भरली असल्याची खात्री करुन भरणा केलेल्या बँक चलनाची प्रत अथवा या कार्यालयामध्ये रोखीने भरणा केलल्या पावतीची प्रत सादर करणे अनिर्वाय आहे.